वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
कृषि नगर वसमत रोड,परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र)

विद्यापीठ अधिकारी /कर्मचारी यांचेकडून सेवाविषयक/बदली करीता अशासकीय व्यक्तीकडून दबाव आणल्यास शिस्तभंगाची कार्यवाही सूरू करणेबाबत..

## परिपत्रक

क्रंमाक:२०२३/प्र.क्र.६/परिपत्रक /आस्था-८ / 1646
दिनांक : १३ /०४/२०२३ 17

प्रकरणी विद्यापीठातील अधिकारी /कर्मचारी हे वैयक्तिक सेवाविषयक कामे करण्यासाठी विशेषत: बदलीच्या संबंधात मा.कुलगुरु महोदय/कुलसचिव/ बदली समिती यांना अशासकीय व्यक्तीकडून / लोकप्रतिनिधी यांचेकडून दुरध्वनी तसेच लेखी पत्राव्दारे प्रत्यक्ष शिफारशी प्राप्त होत असल्यामुळे विद्यापीठाच्या हिताचे निर्णय अडचणी निर्माण होत आहेत, शिवाय विद्यापीठाचा संशोधनात्मक/शिक्षण/ विस्तार करण्याच्या धोरणावर त्याचा दुरगामी परिणाम होत आहे. विद्यापीठ अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून अशा पध्दतीने नियमबाहय सेवाविषयक/बदलीचे काम करण्यासाठी अप्रत्यक्ष दबाव तंत्राचा वापर करणे ही बाब निश्चीतच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक)नियम १९७९ च्या नियम २३ चे भंग करणारी आहे.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विद्यापीठांतर्गत अधिकारी /कर्मचारी यांना कळविण्यात येते की, आपल्या वैयक्तिक अथवा बदली संदर्भात यापुढे जर राजकीय किंवा अन्य पदाधिकारी यांच्या शिफारशी किंवा दबाव आणल्याचे निदर्शनास आल्यास आपल्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम १९७९ नुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

मा.कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने,

(धिरजकुमार रा.कदम )
कुलसचिव

प्रतिलीपी :
१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि),वनामकृवि,परभणी
२.संचालक संशोधन,वनामकृवि,परभणी
३.संचालक विस्तार शिक्षण,वनामकृवि,परभणी
४. नियंत्रक,वनामकृवि,परभणी
५.विद्यापीठ अभियंता,वनामकृवि,परभणी
६. उपकुलसिचव (आस्था / साप्रवी /विद्या )वनामकृवि,परभणी
७. सर्व कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी/सर्व कार्यक्रम समन्वय,केव्हीके
यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक हे आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

प्रत:-
१. प्रभारी अधिकारी,मध्यवर्ती संगणक केंद्र,वनामकृवि,परभणी यांना माहितीस्तव देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारीत करावे.
२. मा.कुलगुरु महोदय, यांचे खाजगी सचिव,वनामकृवि,परभणी.